सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
Savitribai Phule Pune University
(Formerly University of Pune)

परीक्षा व मूल्यमापन मंडळ
गणेशखिंड, पुणे — ४११ ००७
दूरध्वनी क. (०२०) २५६२ १३९८
Website: www.unipune.ac.in

Board of Examinations & Evaluation
Ganeshkhind, Pune – 411 007
Telephone: (020) 2562 1398
E-mail: coe@unipune.ac.in

**संदर्भ क्र.:** परीक्षा/छावता/१७६८ **दिनांक :** ०८/११/२०२५

**"अत्यंत महत्वाचे"**

प्रति
**मा. प्राचार्य/संचालक,**
सर्व संलग्नित महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था,
प्रस्तुत विद्यापीठ
(पुणे, अहिल्यानगर, नाशिक जिल्हा व दादरा-नगर हवेली)

**विषय : परीक्षा अर्ज भरण्याच्या प्रक्रियेतील ज्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील हिवाळी २०२५ सत्राचे परीक्षा अर्ज अद्याप भरावयाचे/कायम करायचे/शुल्क भरायचे राहून गेले आहेत अशा विद्यार्थ्यांच्या परीक्षा अर्जाबाबत.**
(सीईटी द्वारा २०२५—२०२६ मध्ये प्रथम सत्रास प्रवेशित विद्यार्थी तसेच **BHMCT** अभ्यासक्रम वगळून)

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२५-२६ हिवाळी सत्र २०२५ मधील परीक्षांसाठी सर्व विद्याशाखेअंतर्गत विविध अभ्यासक्रमांकरिता परीक्षा अर्ज सुरु करण्यात आलेले होते. सदर परीक्षांचे अर्ज भरण्याचा कालावधी अधिकवेळा मुदतवाढ देऊन अंतिमतः संपुष्टात आलेला आहे.

**त्याअनुषंगाने परीक्षा अर्ज सुरू करण्यात आलेल्या कालावधीत कोणत्याही कारणास्तव ज्या विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज अद्याप भरावयाचे राहिले असतील त्या विद्यार्थ्यांना परीक्षा अर्ज भरण्यासाठी, ज्या विद्यार्थ्यांनी परीक्षा अर्ज भरल्यानंतर महाविद्यालयामार्फत परीक्षा अर्ज कायम (Inward) करावयाचे राहिले असतील त्या महाविद्यालयाना परीक्षा अर्ज कायम करण्यासाठी** तसेच **महाविद्यालयाने परीक्षा अर्ज कायम (Inward) केल्यानंतर ज्या विद्यार्थ्यांकडून परीक्षा शुल्क भरावयाचे राहून गेले आहे अशा सर्व संबंधित विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्क भरण्यासाठी खालीलप्रमाणे विशेष अंतिम संधी देण्यात येत आहे :—**

| विद्यार्थ्यांने परीक्षा अर्ज नियमीत शुल्कासह भरण्याचा **अंतिम विशेष कालावधी** | महाविद्यालय/परिसंस्थेने परीक्षा अर्ज कायम (Inward) करण्याकरिताचा अंतिम दिनांक | विद्यार्थ्यांने विलंब शुल्कासह परीक्षा अर्ज भरण्याकरिताचा कालावधी | महाविद्यालय/परिसंस्थेने विलंब शुल्कासह भरलेले परीक्षा अर्ज कायम (Inward) करण्याकरिताचा कालावधी | विद्यार्थ्यांने अतिविलंब शुल्कासह परीक्षा अर्ज भरण्या—करिताचा कालावधी | महाविद्यालय/परिसंस्थेने विलंब व अतिविलंब शुल्कासह भरलेले परीक्षा अर्ज कायम (Inward) करण्याकरिताचा कालावधी | विद्यार्थ्यांने नियमित शुल्कासह परीक्षा अर्ज भरल्यानंतर परीक्षा शुल्क भरण्याचा अंतिम दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|
| **शनिवार दिनांक ०८/११/२०२५ सायं. ५.०० ते सोमवार १०/११/२०२५ सकाळी १०.०० पर्यंत** | **१०/११/२०२५ दुपारी १२.००पर्यंत** | — | — | — | — | **१०/११/२०२५ दुपारी १.०० पर्यंत** |

**सदरची मुदतवाढ केवळ सोमवार, दि. १०/११/२०२५ पर्यंत आणि उपरोल्लोखित वेळेच्या मर्यादितच आहे.**

....२/—

- **विशेष सूचना: परीक्षा अर्जातील त्रुटी दुरूस्त करणे / अर्ज रद्द करून नव्याने भरणे.**

तसेच ज्या विद्यार्थ्यांचे परीक्षा फॉर्म, परीक्षा शुल्क भरलेले आहेत पण अनवधानाने परीक्षा फॉर्म मध्ये काही त्रुटी राहून गेलेल्या आहेत आणि असे परीक्षा फॉर्म महाविद्यालयास रद्द करावयाचे आहेत त्यासाठी त्वरित examsupport@pun.unipune.ac.in वर खालील नमूद माहितीसह ईमेल करावा जेणेकरून उपरोक्त विहित मुदतीतच सदरचा फॉर्म रद्द करून त्वरित सदरच्या विद्यार्थ्यांस नव्याने परीक्षा फॉर्म भरता येईल.

**मेल चा विषय — परीक्षा फॉर्म रद्द करणेबाबत....**

१. **विद्यार्थ्यांचे नांव :**
२. **PRN क्रमांक :**
३. **परीक्षा फॉर्म क्रमांक :**
४. **परीक्षा फॉर्म का रद्द करावयाचा आहे त्यांचे कारण —**

**परीक्षा फॉर्म विहित मुदतीत सादर करू न शकल्यामुळे त्यास मुदतवाढ देणेबाबत विद्यार्थी, पालक, विद्यार्थी संघटना, संलग्नित महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था यांचेकडून वारंवार विनंती व पाठपुरावा करण्यात येत आहे. त्यास अनुसरून व विद्यार्थीहित विचारात घेता संबंधित विद्यार्थ्यांच्या परीक्षा व मूल्यमापन बाबींच्या तसेच पूर्वीच्याच अटी व शर्तींच्या अधीन राहून उपरोक्त शेवटची संधी देण्यात येत आहे.**

NON NEP पॅटर्नमधून NEP 2020, दोन्ही सत्रे एकत्र लावणे किंवा थेट दुसऱ्या वर्षी प्रवेश अशा सर्व विद्यार्थ्यांना परीक्षा अर्ज भरण्यासाठी कमी दिवसांचा कालावधी मिळालेला आहे हे लक्षात घेऊन महाविद्यालयांनी याबाबत रविवारची सुट्टीही उपयोगात आणावी आणि परीक्षा विषयक प्रक्रिया निर्विघ्नपणे सुरू ठेवावी.

ही मुदतवाढ अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत आणि अशी मुदतवाढ केवळ अशक्य असतानाही देण्यात आली आहे, त्यामुळे सर्व महाविद्यालये/परिसंस्थांनी आज उशीरा, रविवारी पूर्ण दिवस परीक्षा विभाग कार्यरत ठेऊन तसेच सोमवारी सकाळी १० पर्यंत अतिशय काळजीपूर्वक ही प्रक्रिया राबवावी आणि विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहणार नाही, याबाबत सतर्क रहावे. याबाबतीत कसूर झाल्यास महाविद्यालये/परिसंस्था जबाबदार राहील.

**विशेष टीप** : अतिवृष्टी आणि सद्य:स्थिती लक्षात घेऊन विलंब व अतिविलंब शुल्क आकारण्यात आलेले नाही. तरी आताची ही मुदतवाढ अंतिम मुदतवाढ समजून कार्यवाही व्हावी.

सदर पत्रातील आशय सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून देण्यात यावा तसेच परीक्षेपासून एकही पात्र विद्यार्थी वंचित राहणार नाही याची सर्वोतपरी काळजी घ्यावी, ही विनंती.

कळावे,

आपला,

**(प्रा. डॉ. प्रभाकर देसाई)**
**प्रभारी संचालक,**
**परीक्षा व मूल्यमापन मंडळ**

परीक्षा अर्ज भरण्यातील प्रक्रियेदरम्यान येणाऱ्या अडचणी व त्रुटींसाठी ०२०-७१५३३६३३ या दूरध्वनीवर अथवा examsupport@pun.unipune.ac.in या मेलवर त्वरित संपर्क साधावा.